संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कुंभमेळ्याचे गुणात्मक वैशिष्ट्य समोर यावे

**भारताच्या** प्राचीन आध्यात्मिक परंपरेचे किंबहुना सांस्कृतिक संचिताचे निदर्शक म्हणून विशिष्ट कालावधीनंतर होणाऱ्या कुंभमेळ्यांचेच उदाहरण देता येते. प्रयाग येथे सुरू झालेला अर्धकुंभमेळा जरी असला तरी त्यासाठी झालेली नागरिकांची गर्दी नेहमीप्रमाणेच उच्चांक गाठणारी ठरते. पहिल्याच दिवशी जवळपास दोन कोटी लोकांनी प्रयाग येथे गंगा स्नानाची पर्वणी साधली. जगातला सर्वात मोठा सांस्कृतिक उपक्रम म्हणून कुंभमेळ्यांचे वर्णन केले जाते आणि ते खरेही आहे. एकाचवेळी इतक्या प्रचंड संख्येने जगात सांस्कृतिक किंवा आध्यात्मिक कारणासाठी लोक एकत्रित येण्याचा हा एकमेव प्रकार ठरतो. बारा वर्षांनी भरणारा कुंभमेळा आणि सहा वर्षांनी भरणारा अर्धकुंभमेळा अशी साधारणपणे त्याची रचना असते पौराणिक कथेनुसार समुद्रमंथन झाल्यानंतर प्राप्त झालेला अमृतकुंभ देव घेऊन जात असताना त्या कुंभातले अमृत उज्जैन, प्रयाग, नाशिक, आणि अलाहाबाद याठिकाणी पडले. म्हणून या ठिकाणी विशिष्ट कालावधीत या कुंभांचे आयोजन होते. प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा आजही टिकून आहे. परंतु काळानुसार त्यातही अनेक दोष निर्माण झाले. खरे तर भारतीय आध्यात्मिक परंपरेप्रमाणे अहंकार, क्रोध व मोहाला दूर ठेवण्याचे आव्हान केले जाते. पण या कुंभाच्या निमित्ताने साधुसंतांचे जे आखाडे निर्माण झाले ते आखाडे एकमेकांमधल्या मतभेदांचे आणि विद्वेषाचेही प्रदर्शन करीत असतात. साधूंची ही परंपरा प्राचीन स्वरुपाची असली तरीसुध्दा काळानुसार त्यामध्ये काही परिवर्तन होण्याची गरज होती ते परिवर्तन घडू शकलेले नाही आणि म्हणून एवढ्या मोठ्या आध्यात्मिक परंपरेचा अधिक विधायक हेतू साध्य करण्याकरीता उपयोगही होऊ शकत नाही. केवळ भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणून आणि कुंभाच्या निमित्ताने देशभरातील विविध राज्यांतील लोक एकत्र येण्याची एक मोठी परंपरा एवढ्यापुरतेच त्याचे महत्व शिल्लक राहाते. देशाच्या एकतेसाठी किंवा एकात्मतेसाठी ही गोष्ट जरी आवश्यक असली तरी या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक कुंभाचा समाजजीवनाला किंवा एकूण राष्ट्रीय जीवनाला अधिक सकारात्मक उपयोग करून घेता येऊ शकतो.

### राष्ट्रीय उद्दीष्टांचे भान हवे

खरे तर ज्या हेतूने हा कुंभ आयोजित केला जातो. तो साध्य करण्याकरीता साधुंपेक्षाही साधकांची जास्त आवश्यकता आहे. आज सगळ्या कुंभावर वेगवेगळ्या आखाड्यांमध्ये साधूंचाच प्रभाव दिसून येतो. अर्थात हे सगळे साधू त्यांच्या त्यांच्या साधनेतून तपश्चर्येतून काही गोष्टी प्राप्त करीतही असतील. परंतु त्याचा त्यांच्यापुरताच उपयोग होऊन चालणार नाही, समाजातल्या सामान्य घटकापर्यंत त्यांची साधना पोहचली पाहिजे किंवा त्यातून समाजाचा सारासार विवेक जागृत होईल. अशा प्रकारचे प्रयत्नही झाले पाहिजेत. साधूंच्या या आखाड्यांमधून काही प्रमाणात भक्ती किंवा साधनेचे धडे दिले जातात. परंतु ज्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने साधूंची संख्या पाहायला मिळते किंवा त्यांच्या आखाड्यांप्रमाणे व्यवस्थाही करावी लागते ती पाहिल्यानंतर या आखाड्यांना जर अधिक संघटित रुप दिले आणि त्यांच्यातील समान विचारांना सामाजिक आणि राष्ट्रीय उद्दीष्टांसाठी उपयोगात आणले तर बरेच काही साध्य होऊ शकेल. याच अर्थाने जर विचार केला तर कुंभमेळा हा केवळ आध्यात्मिक किंवा सांस्कृतिक उपक्रम ठरत नाही तर ती एक सकारात्मक राष्ट्रीय ऊर्जा म्हणून लक्षात घेतली पाहिजे. कुंभमेळ्यासाठी केले जाणारे नियोजन किंवा त्यावरचा खर्च याची तुलना केली तर या उपक्रमातून निश्चितच अधिक मोठे उद्दीष्ट साध्य केले जाणे अपेक्षित ठरते. परंपरेनुसार कुंभमेळ्यामध्ये येणाऱ्या भाविकांची व्यवस्था म्हणजेच त्या दिवशी एका विशिष्ट मुहूर्ताला गोदावरी, क्षिप्रा किंवा गंगेमध्ये स्नान करण्यासाठी प्रचंड मोठे नियोजन करावे लागते. कोट्यवधी लोकांना नियंत्रित करून सुरक्षा व्यवस्थाही चोख ठेवावी लागते. संख्यात्मकदृष्ट्या कुंभमेळा हा जागतिक विक्रम मोडणारा ठरतोच आणि तो अनेक वर्षांपासून सुरु असल्यामुळे काळाच्यादृष्टीने त्याचे विशेष महत्व अबाधित राहाते. परंतु अनेक गुणवैशिष्टये असलेला हा कुंभमेळा गुणात्मकदृष्ट्यासुध्दा संपन्न करण्याची अधिक आवश्यकता आहे असे म्हणावे लागते. कारण हजारो वर्षे चालत आलेली ही अखंड परंपरा आणि तिचे संचित वाया जाऊ देता कामा नये. तिथे येणारे भक्त किंवा अनुयायी नकळतपणे एक आध्यात्मिक शक्ती घेऊन येतात आणि ते हे संचित जर उचित पध्दतीने प्रवाहित राहिले तर खऱ्या अर्थाने भारतीयांना त्याचा अभिमान वाटू शकेल.

### सामाजिक आविष्कार

आजच्या विज्ञान युगामध्ये भारताकडे असलेले हे अध्यात्माचे संचित अधिक अभ्यासपूर्ण पध्दतीने जगासमोर मांडले गेले पाहिजे कारण या कुंभमेळ्याला जगाच्या अनेक भागातूनही परदेशी लोक येतात. त्यांना येणारा अनुभव किंवा भारतातील अध्यात्माविषयी त्यांच्या मनात असलेली श्रध्दा भारतासाठीसुध्दा मोठा संदेश देणारी ठरू शकते. यादृष्टीकोनातून विचार केला तर कुंभमेळा हा भक्तीच्या संचिताबरोबरच एक सामाजिक श्रध्देचा भाग झाला पाहिजे. त्यातली परंपरा मूल्ये कायम ठेवून मानवी मूल्यांचे संवर्धन करण्याचा आणि त्याचा सामाजिक आविष्कार साध्य करण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो. सरकारतर्फे कोट्यवधी रुपये खर्च करून यात्रेकरूंची व्यवस्था केली जाते. परंतु ही तीर्थक्षेत्रे किंवा कुंभमेळा ही ज्ञानक्षेत्रे अर्थात ज्ञानमेळे म्हणूनच आकाराला आली पाहिजेत. परंपरेनुसार चालत आलेला परंतु आता काळाच्या ओघात अनावश्यक असलेला भाग काढून भारतीय आध्यात्मिकतेचे एक पायाभूत सत्य मांडले गेले पाहिजे. वेदकाळापासून ज्ञान हाच तिचा पाया होता. म्हणूनच ही तीर्थक्षेत्रे आणि तिथे भरणारे हे उपक्रम ज्ञान प्रदान करण्याचे दालन होणे जास्त संयुक्तिक ठरते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कुंभमेळ्याच्या सोयीसुविधा अद्ययावत केल्या जातात. जगाला या अलौकिक उपक्रमाची माहिती पोहचवण्याचा प्रयत्न होतो. त्याचवेळी या कुंभमेळ्याच्या मुळाशी असलेला ज्ञान आणि माणुसकीच्या मूल्यांचा आणि अमृताचा झरादेखील सर्वदूर पोहचला पाहिजे.